ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# भारतातील मजुरांचे किमान वेतन आणि कृषी मजुरांच्या वेतनातील तफावत

**प्रा. डॉ. वाय. एस. गायकवाड,** प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली.

**प्रस्तावना:**

भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान असून भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. शेतीमध्ये काम करणाऱ्या शेतमजूराला आज मोठयाप्रमाणात मागणी आहे. शेती क्षेत्राव्यतिरिक्त इतर बऱ्याच व्यवसायामध्ये श्रमिकांच्या संघटना स्थापन झालेल्या आहेत, परंतु भारतातील शेतीक्षेत्रात शेतमजूरांच्या संघटना स्थापन झालेल्या नाहीत. कारण शेतमजूर असंघटीत असल्यामुळे त्यांची सौदाशक्ती सापेक्षतेने कमी राहते. त्यामुळे त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती अत्यंत हालाखीची असल्याचे आढळून येते. परिणामी त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शेतमजूरांचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावयाचा असेल तर त्यांना कायद्याने निश्चित केलेले किमान वेतन प्राप्त होणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्यामधून नेतृत्व निर्माण होणे आवश्यक ठरते. एकंदरीत शेतमजूरांचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा वाढण्यासाठी त्यांना किंमान वेतनाची आवश्यकता, त्यांच्या सौदाशक्तीत वाढ होण्यासाठी संघटना आणि नेतृत्वाची अत्यंत आवश्यकता आहे. सदर शोधनिबंधात प्रामुख्याने शेतमजूरांच्या किमान वेतनाच्या प्रश्नाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टये:**

1. शेतमजूराचा अर्थ समजून घेणे.
2. भारतातील शेतमजूरांच्या संख्येतील वाढ अभ्यासणे.
3. शेतमजूरांच्या किमान वेतन प्रश्नाचा अभ्यास करणे.
4. भारतातील विविध राज्यातील शेतमजूरांच्या मजूरीच्या दरातील तफावतीचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत शोधनिबंध पूर्णतः द्वितीय साधनसामग्रीवर आधारित आहे. माहितीचे संकलन करण्यासाठी संदर्भ पुस्तके, विविध अहवाल, इंटरनेट इत्यादीचा उपयोग केला आहे. माहितीच्या विश्लेषणासाठी विविध सांख्यिकीय साधनांचा उपयोग केला आहे.

**शेतमजूरांच्या व्याख्या:**

कृषी क्षेत्राच्या विकासात अनेक घटकांचे योगदान असते आणि त्या घटकांमध्ये महत्वाचा व मूलभूत असा घटक म्हणून कृषी क्षेत्रातील मजूर होय.

1. दुसऱ्या कृषी श्रमिक चौकशी समितीच्या मते (1956–57), ''पीक उत्पादनात गुंतलेल्या श्रमिकाबरोबरच इतर शेतकी परिचलनात रोजंदारीवर काम करणाऱ्यांनाही कृषी श्रमिक समजण्यात येईल. म्हणजेच कृषी श्रमिक फक्त शेतमालाचे उत्पादन करणाऱ्याच व्यक्ती नव्हे तर पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व मधुमक्षिकापालन इ. पूरक व्यवसायामध्ये काम करणाऱ्या व्यक्तींनाही कृषी श्रमिक म्हणता येईल.''
2. राष्ट्रीय श्रम आयोगाच्या मते, ''ज्या व्यक्ती अकुशल आणि असंघटीत असून उपजिविकेसाठी ज्याच्या जवळ श्रम हेच साधन आहे त्यांना शेतमजूर म्हणता येईल. उदा. भूमिहीन शेतमजूर, सिमांत आणि अल्पभूधारक.''
3. भारतीय जनगणनेच्या आधारे, ''मुद्रा किंवा वस्तूच्या स्वरूपात मिळणारी मजूरी किंवा वेतन म्हणून उत्पादनातील हिस्सा घेणारी जी व्यक्ती दुसऱ्याच्या शेतात केवळ मजूर म्हणून काम करते आणि जिचा लागवडीच्या व्यवस्थापनात काही सहभाग नसतो तिला शेतमूजर म्हणतात.''

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**कृषी श्रमिकाची महत्वपूर्ण वैशिष्टे:**

1. भारतीय कृषी श्रमिकामध्ये शिक्षणाचा अभाव आढळतो.
2. कृषी श्रमिक असंघटीत आहेत.
3. कृषी श्रमिकांना मिळेत ते काम करावे लागते. त्यांना कामाची शाश्वती नसते.
4. कृषी क्षेत्रातील श्रमिकांना मिळणारा मोबदला कमी आहे.
5. कृषी श्रमिकांमध्ये इतर कौशल्याचा अभाव असल्याने त्यांना इतर क्षेत्रात कामाची उपलब्धता कमी असते.

**भारतातील कृषी श्रमिकांच्या संख्येतील वाढः**

2011 च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी 68.9 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागातील बहुसंख्य लोक शेतीवरती आपली उपजीविका करीत असतात. भारतातील एकूण श्रमिकांपैकी कृषी क्षेत्रात कार्यरत लोकांपैकी कृषी श्रमिकांची संख्या पुढील तक्ता क्रमांक 1 मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 1 : भारतातील कृषी श्रमिकांची संख्या**

| वर्ष | एकूण श्रमिक संख्या (कोटी) | एकूण कृषी श्रमिक (कोटी) | प्रमाण |
|---|---|---|---|
| 1951 | 14.0 | 2.75 | 19.7 |
| 1971 | 18.1 | 4.71 | 26.3 |
| 1981 | 24.5 | 5.54 | 22.5 |
| 1991 | 28.6 | 7.46 | 26.1 |
| 2001 | 40.1 | 10.70 | 27.0 |
| 2011 | 48.7 | 14.53 | 29.3 |

स्त्रोतः Economic Survey (2006-07 & 30213-14)

तक्ता क्र. 1 वरून असे आढळून येते की भारतातील एकूण श्रमिकांची संख्या वाढत आहे. देशातील एकूण श्रमिकांमध्ये कृषी श्रमिकांची सेख्या आणि प्रमाण वाढत आहे. भारतातील कृषी श्रमिकांचे प्रमाण 1951 मध्ये 9.7 टक्के होते ते 2011 मध्ये 29.3 टक्के झाले आहे. याच्या मागची कारणमीमांसा विचारात घेतली असता त्यामध्ये प्रामुख्याने लोकसंख्येतील वाढ, शेतीवरील अवलंबित्व अधिक, ग्रामीण भागात पर्यायी रोजगार संधीचा अभाव, जमिनीचा लहान आकार, संयुक्त कुटुंब पध्दतीचा ऱ्हास, कर्जबाजारीपणामुळे जमिनीचे सावकाराकडे हस्तांतरण इ. आहेत. थोडक्यात डॉ. राधाकमल मुकर्जी यांच्या मते लहान शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर प्रतिकूल परिणाम करणारी प्रत्येक बाब शेतमजूरांच्या संख्येत वाढ करण्यासाठी कारणीभूत ठरली आहे.

**शेतमजूरांसाठी किमान वेतन :**

किमान वेतनाचा कायदा शेतमजूरांना लागू करावा किंवा नाही याचा उहापोह पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभी करण्यात आला. किमान मजूरीचा कायदा शेतीमध्ये सुरूवातीला काही विशिष्ट क्षेत्रामध्ये आणि तेही विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या शेतांनाच लागू करण्यात यावा अशी नातू समितीने नियोजन मंडळाला शिफारस केली. या शिफारशीनुसार किमान मजुरीचा कायदा शेतीला लागू करण्याचा नियोजन मंडळाने निर्णय घेतला. वस्तूंच्या प्रचलित किंमती आणि राहणीमान हया गोष्टींचा विचार करून प्रत्येक राज्य सरकारने किमान मजूरीचा दर निश्चित करावा असे ठरविण्यात आले. हया निर्णयानुसार केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेशात आणि राज्य सरकारांनी आपापल्या राज्यामध्ये किमान मजूरीचा दर ठरवून दिला.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

तक्ता 2 : निवडक राज्यातील मजूरीची किमान व कमाल पातळी
(दर दिवसाला – रूपयामध्ये) (2013–14)

| राज्य | मजूरीची न्यूनतम पतळी | मजूरीची कमाल पातळी |
|---|---|---|
| आंध्रप्रदेश | 58.00 | 474.31 |
| दिल्ली | 279.00 | 369.00 |
| आसाम | 165.41 | 263.82 |
| छत्तीसगढ | 118.76 | 213.58 |
| बिहार | 162.00 | 260.08 |
| गुजरात | 100.00 | 253.35 |
| हरियाणा | 205.44 | 230.44 |
| कर्नाटक | 114.23 | 280.34 |
| केरळ | 197.04 | 483.00 |
| मध्यप्रदेश | 143.08 | 185.58 |
| महाराष्ट्र | 100.00 | 159.85 |
| मणिपूर | 122.10 | 132.60 |
| ओरिसा | 150.00 | 205.00 |
| पंजाब | 164.06 | 209.18 |
| राजस्थान | 166.00 | 236.00 |
| तामिळनाडू | 85.00 | 273.36 |
| उत्तरप्रदेश | 100.00 | 209.44 |
| प.बंगाल | 112.50 | 205.77 |

Source: Annual Report 2013-14, Ministry of Labour and Employment, Govt. of India

शेती क्षेत्रात किमान मजूरी कायद्याची अंमलबजावणी बदल राष्ट्रीय श्रम आयोगाने आपल्या अहवालात व्यक्त केलेल्या मताचा विचार करणे आवश्यक आहे. मजुरीचा किमान दर ठरविणाऱ्या व नंतर कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांचे स्वरूप वेगवेगळे व यंत्रणा अत्यंत निष्क्रीय स्वरूपाची आहे. तसेच बराच काळ उलटून गेल्यानंतरही मजूरीच्या किमान दरामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले नाहीत. त्याबरोबरच बहुसंख्य शेतमजूरांना कायद्याची जाणीव नव्हती आणि कायद्याची उपेक्षा करण्यात आलेल्यांना कडक शासन करण्यात आलेले नाही.

भारतामध्ये 1948 पासून किंमान वेतन कायदा अस्तित्वात आहे. परंतु शेती व्यवसायाच्या वैचित्र्यपूर्ण परिस्थितीमुळे तेथे कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होऊ शकली नाही. परिणामतः औद्योगिक कामगार आणि देशातील विविध राज्यांनी आपल्या परिस्थितीनुसार किमान मजूरीच्या वेगवेगळया मर्यादा निश्चित केल्या होत्या पण काही ठिकाणी त्या केंद्रीय निर्देशापेक्षा कमी आढळतात. उदा. 2008–09 मध्ये केंद्रीय निर्देशानुसार हा दर 78 रूपयापेक्षा कमी होता. बहुतेक राज्यांनी प्राप्त झालेल्या सुचनेनुसार किमान मजुरीची न्यूनतम पतळी व कमाल पातळी निश्चित केली होती. देशातील निवडक राज्यामध्ये ती पातळी 2013–14 मध्ये किती आहे ते तक्ता क्र. 2 मध्ये दर्शविण्यात आले आहे.

तक्ता क्र. 2 वरून असे आढळून येते की देशातील निवडक राज्यातील किमान मजूरीची न्यूनतम पातळी आणि कमाल पातळी दरामध्ये भिन्नता आहे. मात्र त्यांच्या मजूरी दरामध्ये वाढ होत आहे. असे आढळून येते. शेतीच्या हंगामामध्ये मजूरांची मागणी बरीच वाढत असल्याने बाजार दर किमान दरापेक्षा कितीतरी जास्त असतो. याउलट हंगाम नसताना मजूर कमी दरातही काम करण्यास तयार असतात.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

परिणामी किमान दर असून किंवा नसून काही फरक पडत नाही. ही बाब राष्ट्रीय ग्रामीण श्रम आयोगाने मान्य केली आहे. मात्र किमान मजूरी दराचे आयोगाने समर्थन केले आहे.

देशातील विविध घटक राज्यात पुरूष आणि स्त्री शेतमजूरांना देण्यात येणारे किमान वेतन वेगवेगळया कालावधीत किती आहे याची कल्पना पुढील आकडेवारीवरून येते.

तक्ता 3 : विविध घटक राज्यातील सरासरी शेतमजूरीचा दर (रूपयामध्ये)

| राज्य | 2005–06 | | 2010–11 | | 2014–15 | | वाढीचे प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री |
| आंध्रप्रदेश | 62 | 44 | 162 | 124 | 277 | 195 | 22.38 | 22.56 |
| आसाम | 66 | 48 | 118 | 95 | 242 | 190 | 27.27 | 25.26 |
| बिहार | 60 | 47 | 129 | 112 | 205 | 194 | 29.26 | 24.22 |
| छत्तीसगढ | 48 | 36 | 85 | 66 | 176 | 124 | 27.27 | 29.03 |
| गुजरात | 78 | 62 | 118 | 107 | 185 | 161 | 42.16 | 38.50 |
| हरियाणा | 111 | 90 | 224 | 184 | 372 | 308 | 29.83 | 29.22 |
| हिमाचल प्रदेश | 85 | 83 | 158 | 128 | 247 | 228 | 34.41 | 36.40 |
| झारखंड | NA | NA | 106 | 100 | NA | NA | —— | —— |
| कर्नाटक | 68 | 60 | 130 | 125 | 279 | 235 | 24.37 | 25.35 |
| केरळ | 163 | 108 | 306 | 236 | 535 | 405 | 30.46 | 26.66 |
| मध्यप्रदेश | 55 | 46 | 103 | 92 | 187 | 162 | 29.41 | 28.39 |
| महाराष्ट्र | 54 | 40 | 100 | 80 | 152 | 100 | 35.52 | 40.00 |
| ओरिसा | 48 | 47 | 102 | 80 | 197 | 150 | 24.36 | 31.33 |
| पंजाब | 99 | 53 | 201 | 90 | 338 | 217 | 29.28 | 24.42 |
| राजस्थान | 72 | 39 | 148 | 83 | 275 | 130 | 26.18 | 30.00 |
| तामिळनाडू | 76 | 87 | 160 | 140 | 303 | 217 | 25.08 | 40.09 |
| त्रिपुरा | NA | NA | 188 | NA | 285 | 191 | —— | —— |
| उत्तरप्रदेश | 70 | | 124 | 174 | 226 | 228 | 30.97 | —— |
| प.बंगाल | 62 | 52 | 130 | 110 | 231 | 186 | 26.83 | 27.95 |
| **भारतातील सरासरी** | **74** | **59** | **149** | **180** | **268** | **201** | **27.61** | **29.35** |

Source: Agricultural Wages in India-2014-15, Ministry of Agriculture and Farmers Welfare, GoI.

तक्ता 3 वरून असे आढळून येते की, देशातील निवडक घटक राज्यातील पुरूषांच्या मजुरी दरामध्ये झालेली वाढ विचारात घेता गुजरात, हिमाचल प्रदेश, केरळ, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश या राज्यात मजुरीच्या वाढीचे प्रमाण अधिक म्हणजेच 30 ते 40 टक्क्यांदरम्यान आहे. आणि इतर घटक राज्यात हे प्रमाण 22 ते 29 टक्क्यांदरम्यान आहे. तसेच स्त्री मजुरी दरामध्ये झालेली वाढ गुजरात, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा, राजस्थान, तामिळनाडू येथे अधिक म्हणजे 30 ते 40 टक्क्यांदरम्यान आढळून येते. इतर घटक राज्यात ते 22 ते 29 टक्क्यांदरम्यान आढळून येते.

सारांश रूपाने शेती आणि ग्रामीण विकासात कृषी शेतमजूरांना अनन्यसाधारण महत्व आहे. मात्र त्यांना समाजात दुय्यम स्थान दिले जाते. तसेच त्यांच्या आर्थिक स्थितीला जबाबदार ठरलेले घटक म्हणजे मजुरीचा अल्पदर, किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी न होणे, रोजगार संधीचा अभाव, शेतमजुरांचे अल्प उत्पन्न, शेतमजूरांचा कर्जबाजारीपणा, संघटनेचा व नेतृत्वाचा अभव, शेतमजूरांच्या

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

प्रश्नाकडे नियोजन मंडळाने केलेले दुर्लक्ष, निरक्षरता व अज्ञान इत्यादी. थोडक्यात शेती क्षेत्रामध्ये किमान मजूरीचा दर कार्यान्वित करण्यात आल्यानंतरही त्याचा अपेक्षित परिणाम घडून आला नाही.

थोडक्यात शेतमजूरांच्या वेतन प्रश्नांसंदर्भात असे म्हणता येईल की,

1. निरनिराळया राज्यातील शेतमजूरांच्या दरामध्ये बरीच भिन्नता आहे.
2. पुरूष मजूर आणि स्त्री मजूर यांच्या मजूरीच्या दरामध्ये नेहमीच तफावत असून स्त्रियांना मिळणारा दर कमी आहे.
3. किमान मजूरीच्या कायद्याचे अस्तित्व केवळ कागदावर आहे. कारण हंगामामध्ये मजुरीचे दर मजुराच्या मागणी व पुरवठयानुसार ठरत असतात.
4. शेतमजुरांच्या कमी मजुरीच्या दरामुळे तसेच कामाच्या कमी दिवसामुळे शेतमजुरांचे एकूण उत्पन्न कमी राहते. अर्थात मजूरामध्ये विपन्नावस्था कायम राहते.

**शेतमजूरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाय योजनाः**

1. किमान वेतन ठरविताना सरकारने किंमत वाढीचा वास्तव विचार करून किमान वेतन ठरवावे हे वेतन शेतमजुरांना कायद्याने मिळेल याची व्यवस्था करावी.
2. दलाल पध्दती संपुष्टात आणून शेतमजूरांचे आर्थिक शोषण थांबवावे.
3. शेतमजूरामधील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी शिक्षण प्रसार अभियान राबवावे.
4. शेतमजुरांच्या कामाच्या वेळा व तास कायद्याने निश्चित करून द्याव्यात.
5. शेतमजुरासाठी वृध्दापकाळासाठी पेन्शन योजना अंमलात आणावी.
6. शेतमजूरांचा कर्जबाजारीपणा कमी करण्यासाठी उपाय योजना करावी.
7. शेतमजुरांमधील व्यवनाधिनता व अंधश्रध्दा कमी करण्यासाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा.
8. शेतमजुरांच्या संघटना स्थापन करून त्यांची नांदणी करण्याची व्यवस्था करावी.
9. पुरूष शेतमजुर आणि स्त्री शेतमुर यांच्या वेतनातील विषमता कमी करण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे.
10. रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात.

**संदर्भः**

1. डॉ. प्रभाकर देशमुख, '' श्रमाचे अर्थशास्त्र '' विद्या प्रकाशन, नागपूर, जानेवारी 1987.
2. डॉ. कविमंडन विजय, '' कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र'' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 2012.
3. Dr. Mamoria C. B. & Dr. Tripathi Badri Bishal " Agricultural Problems of India" Kitab Mahal, Patna. 2003.
4. अर्थसंवाद, एप्रिल–जून 2011.
5. अर्थसंवाद, जुलै–सप्टेंबर 2012.
6. अर्थसंवाद, एप्रिल–जून 2015.
7. Economic Survey (2006-07 & 30213-14)
8. Annual Report 2013-14, Ministry of Labour and Employment, Govt. of India
9. Agricultural Wages in India-2014-15, Ministry of Agriculture and Farmers Welfare, GoI.